**वादी तर्फे उलटतपास – श्री. ए. एस. फराकटे वकील.**

**१४**. माझे शिक्षण झालेले नाही. मी रात्रशाळेत थोडेफार शिकल्यामुळे स्वाक्षरी करु शकतो. मला वाचता येत नाही. मला अनुसया बाबत माहिती नाही. मी हा दावा माझ्या वकिलांकडून समजून घेतला असून माझी कैफियत दिली आहे. मला शंकर बापू देसाई बाबत माहिती असून तो मयत झालेला आहे. मला तो कधी मयत झाला याबाबत सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्याचे गाव शिरसंगी, ता. आजरा होते. माझी व त्याची कधीतरी शिरसंगी येथे भेट झाल्यामुळे मला त्याच्या बाबत माहिती आहे.

**१५.** वादी क्र.२ शंकर देसाई ची पत्नी असून वादी क्र.१ मुलगी आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादी क्र.१ चे लग्न होईपर्यंत ते सर्व शिरसंगी येथे राहत होते. दावा मिळकतीचा पुर्वीचा सर्वे क्र.१३७ असून तुकडेबंदी अमलामध्ये त्याचे गट क्र.३१५ व ३१६ झाले आहे. त्या जमिनीच्या पुर्वेला कोंडिबा आप्पा कुंभार याची जमीन आहे. हे म्हणणे खरे नाही की, कोंडिबा हा आप्पा कुंभार चा मुलगा आहे.

**१६**. दावा मिळकतीच्या पश्चिमेला महादू आप्पा चौगुले ची जमीन असून सध्या विठ्ठल देसाई ची आहे. सदर मिळकतीच्या दक्षिणेला संतू रामा बुरुड याची जमीन आणि उत्तरेला गट क्र.३१६ ची उर्वरीत जमीन व त्यालगत ३१५ ची जमीन आहे. दावा मिळकत पुर्वी दत्तात्रय शंकर लुकतुके वकील यांच्या मालकीची होती. पुर्वी तिची ७/१२ उता–याला सर्वे क्र.१३७/१ व १३७/२ अशी नोंद होती. पुर्वी त्यांचे हिस्से पडलेले नसून एकच नकाशा होता.

**१७**. दावा मिळकतीची शंकर देसाई ने दि.०४.०४.१९६० रोजी खरेदी घेऊन तो मालक नात्याने कसत होता. शंकर देसाई दि.१२.०५.२०२२ रोजी मयत झाला आहे. सर्वे क्र.१३७/१ व २ मधील उत्तरेकडील १/२ हिस्सा तानीबाई देसाई व कृष्णा मयेकर यांच्या वहिवाटीस होता. मी शंकर देसाई ने घेतलेले खरेदीपत्र पाहिलेले नाही. मला त्याबाबत माझ्या वकिलांनी माहिती सांगितली असावी. मला त्या खरेदीपत्राला तानीबाई देसाई व कृष्णा मयेकर यांनी नोंदणीकृत संमतीपत्र दिल्याची माहिती नाही. मला त्या मिळकतीमधील तानीबाई देसाई व कृष्णा मयेकर यांच्या वहिवाटीच्या जमिनीचा प्रतिवादी क्र.१ ते ९ यांना कसा अधिकार आला याची माहिती नाही. मी

प्रतिवादी क्र.१ ते ९ यांच्या मालकीचा कागद पाहिलेला नाही.

**१८.** मला शंकर देसाई ने दावा मिळकती बाबत दाखल केलेला नि. दि. दा. क्र.५३/१९७३ दि.०६.१२.१९७५ रोजी मंजूर झाल्याची माहिती नाही. माझा शंकर देसाई च्या मालकी वहिवाटीच्या जमिनीशी काही संबंध नाही. आम्हाला कृष्णा मयेकर याने ३५ वर्षांपूर्वी गट क्र.३१६ मधील काही भाग पोटकूळ हक्काने दिला आहे. त्याबाबतचा कबूलायत कागद आमच्या आईने करुन दिला होता. मी तो कागद कोठे आहे याचा तपास केलेला नाही. आमच्या नावाची ४८ वर्षांपूर्वी फेरफार नोंद झाली आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्याबाबत आमच्या नावाची पोटकूळ म्हणून नोंद झालेली नाही.

**१९.** आम्ही पोटकूळ ठरवून घेण्यासाठी कूळ न्यायालयात प्रकरण चालवले नव्हते. आमची व कृष्णा मयेकर च्या वारसांमध्ये संगनमत होऊन माझ्या नावाची नोंद झाली आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझा गट क्र.३१६ च्या जमिनीशी कोणताही संबंध नाही. माझी दावा मिळकतीची मोजणी होऊन हद्द निश्चित होण्यास कोणताही आक्षेप नाही. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही मे २०१३ मध्ये वादींना शेतात आल्यावर हरकत केली होती. हे म्हणणे खरे नाही की, माझा दावा मिळकतीशी कोणताही अधिकार नसताना खोटी हरकत घेत आहे. माझे प्रतिवादी क्र.१ ते ९ सोबत चांगले संबंध आहेत. आम्ही सर्व मिळून वादीला हरकत करतो. हे म्हणणे खरे नाही की, मी या दाव्यात खोटी कैफियत व खोटा पुरावा दाखल करुन आज खोटी साक्ष देत आहे.

**<u>प्रतिवादी क्र.३ व ४ तर्फे उलटतपास – श्री. एस. आर. पोवार वकील.</u>**

**२०.** माझा ४८ वर्षांपासून दावा मिळकतीशी संबंध आहे. मला १९५७ साली कूळ कायद्याचा अंमल झाल्याची माहिती नाही. सर्वे क्र.१३७/१ व १३७/२ चा नरहर जोशी हा मूळ मालक होता. मला त्या जमिनीमध्ये सुरुवातील कोण कूळे होती याची माहिती नाही. मला सदर मिळकतीशी दत्तात्रय शंकर लुकतुके वकील यांचा संबंध असल्याची माहिती नाही. मी दावा मिळकतीशी माझा संबंध येण्यापूर्वीची कागदपत्रे पाहिलेली नाहीत.

**२१.** गट क्र.३१५ व ३१६ वेगवेगळया गटाच्या जमिनी आहेत. गट क्र.३१६ च्या

जमिनीशी प्रतिवादी क्र.१ व २ यांचा संबंध नसून त्यांची वहिवाट नाही. गट क्र.३१६ मध्ये वादींची मालकी वहिवाट नाही. गट क्र.३१५ मध्ये प्रतिवादी क्र.१ व २ यांची वहिवाट आहे. मला शंकर देसाई व मयेकर यांच्यामध्ये झालेल्या नि. दि. दा. क्र.५०/ १९८४ च्या निकाला बाबत माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र.३१६ मधील जमिनीशी माझा कोणताही संबंध नाही.

**उलट तपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

(आर. पी. थोरे)

दिनांक – २३.१२.२०२५. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, आजरा.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते